## महाराष्ट्र शासन

**अत्यंत तातडीचे**

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉम्प्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- २४ मार्च २०२०

प्रति,

आयुक्त, आरोग्य सेवा व संचालक, रा. आ.अ.,
पुणे.

**विषय राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना व उपचारासाठी वैद्यकीय साहित्य व उपकरणे यांची उपलब्ध विविध दरकरार व शासन उपक्रम व हाफकीन कडीन निविदेच्या दरानुसार पुरवठा करण्यास तयार असणाऱ्या पुरवठादारांकडून तातडीने खरेदी करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत..**

**संदर्भ:** संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांनी जा क्र संआसे/खरेदी कक्ष/ करोना नियंत्रणं व प्रतिबंधात्मक उपायोजना / साहित्य व उपकरणे खरेदीस मान्यता /२०२० दिनांक २१.०३.२०२० चे पत्र.

संदर्भाधिन पत्रान्वये संचालक, आरोग्य सेवा, पुणे यांनी कोव्हीड १९ मुळे उदभवलेल्या आजारावर प्रतिबंध व उपचारास्तव औषधी, वैद्यकीय साहित्य व उपकरणे शासन उपक्रम व हाफकीन कडील मान्य् दरकरारानुसार पुरवठा करण्यास तयार असलेल्या पुरवठादाराकडून तातडीने खरेदी करण्यास मान्यता मिळण्याबाबत प्रस्ताव सादर केला आहे. या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की,

1. सदर खरेदी ही जिल्हास्तरावर उपलब्ध राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत उपलब्ध निधी, जिल्हा वार्षिक योजनांतर्गत निधी, राष्ट्रीय आपत्ती निवारण कक्षाकडून प्राप्त झालेला निधी तसेच वैद्यकीय शिक्षण विभागाला राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कक्ष, महात्मा ज्योतिबा फुले अंतर्गत व वैद्यकीय शिक्षण विभागाच्या कडून प्राप्त अनुदान इत्यादीद्वारे उपलब्ध झालेल्या अनुदानातून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

2. सदर खरेदी ही जिल्हाधिकारी यांच्य अध्यक्षतेखालील गठीत झालेल्या समितीच्या मान्यतेने व शिफारशीनुसार करणे आवश्यक राहील.

३. सदर खरेदी ही हाफकीन अंतर्गत खरेदी कक्ष, बृहनमुंबई महानगरपालिका, केंद्र शासन उपक्रम - एच. एल. एल. लाईफ केअर तसेच अन्य शासन उपक्रम के. ए. पी. एल. लाईफ केअर, तसेच अन्य राज्यशासनाच्या मेडीकल सर्व्हीस कार्पोरेशनचे दरसूचीनूसार करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

4. वैद्यकीय उपकरणे व यंत्रसामग्रीची आवश्यकता व त्याची तांत्रिक विर्निदेश (टेक्नीकल स्पेसिफीकेशन) हे समितीत असलेल्या आरोग्यसेवा संचालनालयाच्या व वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या सदस्यांनी शिफारस करणे किंवा ज्या तांत्रिक विर्निदेशांना मान्यता आहे (Already approved) अशीच उपकरणे ही या समितीच्या मान्यतेने खरेदी करता येतील. तसेच औषधे उपकरणे

व यंत्रसामुग्री कोव्हीड १९ प्रादुर्भावामुळे उदभवलेल्या आजारावर उपचारासाठी आवश्यक असल्याचे या समितीने प्रमाणित करणे आवश्यक राहील. फक्त व्हेंटीलेटर खरेदीची जिल्हानिहाय संख्या मा.मुख्यसचिवांकडून संमत करुन घ्यावी.

खरेदी करतांना अनावश्यक खरेदी/ द्विरुक्ती टाळावी व उपलब्ध अनुदानाच्या मर्यादेतच करण्यात यावी. कोणतेही साहित्य, उपकरणे विनावापर पडून राहणार नाहीत याची सर्वस्वी जबाबदारी खरेदी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या राहील.

सदर मान्यता वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

प्रदीप व्यास

**( डॉ. प्रदीप व्यास)**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत सचिव (वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय मुंबई)
प्रत जिल्हाधिकारी (सर्व)
प्रत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
प्रत संचालक आरोग्य सेवा, मुंबई व पुणे
प्रत संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
प्रत अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व)
प्रत सह संचालक,आरोग्य सेवा (खरेदी) मुंबई
प्रत उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळ, (सर्व)
प्रत जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व)
प्रत जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)